Power of Knowledge Peer Review Journal,Volume :III,Issue :II July.to Sept.2019 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 1000/-

RNI No MAHAUL03008/13/1/2012-TC
ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Volume. III, Issue II**
*July. Sept 2019*

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
E-mail : Sakatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex Vice Chanceller Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

## EDITOR

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

## EDITOR BOARD

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

## REFERECS

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr B A M U Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

## MANGING EDITORS

**Mr. Ramesh Ringne**
Prof. Bapu Ghokshe
Mr. Shivaji Kakade
Dr. Shakur Shaikh Husain

Mr. Vinod Kirdak
Dr. Datta Tangalwad
Mr. Kalandar Pathan
Dr. Suhas Morale
Dr. Baliram Katare

Assit.Prof.Mohan Kalkute
Dr. Adgaonkar Ganesh
Dr. Santosh Chavan
Dr. Rajkumar Yallawad

# स्त्रीवादाचे स्वरूप आणि संकल्पना

प्रा.रमेश रिंगणे
मराठी विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई जि.बीड

स्त्री आणि पुरुष हा भेद निसर्ग निर्मित असला तरी पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेने स्वस्वार्थासाठी स्त्रीला दुय्यमस्थान देऊन तिचे माणूसपणच पुसित केले नाही. न स्त्री स्वातंत्र्य अर्हति या पारंपरिक विचार चौकटीत तिला बसवून तिच्या आचार-विचारांवर निर्बंध घातले एक उपभोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे पहात पातिव्रत्य, धर्माचरण,सदाचरण, यासारख्या बंधनात तिला जखडले. शारिरीक गरजांपलिकडे माणसाच्या आणखी काही गरजा असतात तेच स्त्रियांच्या बाबतीत पध्दतशीरपणे विसरले गेले. स्वताचे अस्तित्व हरवून गेलेल्या स्त्रीला प्रस्थापितांकडून आणि पितृसत्ताक व्यवस्थेकडून आपण मुख्यप्रवाहाकडून बाहेर फेकलो गेल्याची जाणीव झाली. आपले अस्तित्व स्त्री म्हणून टिकवून ठेवण्याचा विचार मनात येऊन स्वसामर्थ्यानिशी तिने जगायला सुरूवात केली.

**स्त्रीवाद संकल्पना व स्वरूप :**

स्त्रीवादाचा अभ्यास करताना अभ्यासकांपुढे काही शब्दांचे अर्थ स्पष्ट असायला हवेत. फिमेल म्हणजे स्त्री फेमिनिझम म्हणजे स्त्री प्राधान्य व फेमिनिष्ट म्हणजे काय ? स्त्रीवादी होय या संकल्पनांचा विचार करता स्त्रीवाद म्हणजे काय ? स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय ? या संकल्पना समजून घेणे महत्वाचे आहे.

**स्त्रीवाद म्हणजे**

डॉ. अश्विनी धोंडगे यांच्यामते स्त्रीवाद म्हणजे पुरूषापासून फारकत घेऊन स्त्रीने आपला स्वता सुभा निर्माण करणे नव्हे तर , स्वताःच्या सामर्थ्याचा शोध घेऊन, स्वतःला ओळखुन आपल्या विकासासाठी, पुरूषांच्या बरोबरीने संधी मिळविण्यासाठी,त्यांच्या खांद्याला खांदा लाउन जीवन जगण्यासाठी , पितृसत्ताक समाजव्यवस्थेने प्रस्थापित केलेल्या परंपरा मोडून आपल्या विकासाचा आपणच मार्ग चोखाळणे म्हणजे स्त्रीवाद.

स्त्रीयांच्या शोषणाबद्दल, अत्याचाराबद्दल समाजात आणि कुटूंबात जागृती घडवून आणणे, त्याविषयीची एकरांग अशा प्रकारची संवेदशीलता जागी करणे आणि स्त्रियांवरील अन्यायाला पोषक अशी परिस्थीती बदलण्यासाठी जाणीवपुर्वक विचार व कृती करणे म्हणजे स्त्रिवाद, स्त्रीवादात शोषण विरहीत वर्ण, वर्ग, जातीविरहीत समाजासाठी संघर्ष हा विचार केंद्रस्थानी आहे. केवळ प्रजोत्पाद हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून स्त्रियांना गुलाम बनविण्याचा समाजव्यवस्थेविरूध्दचा हा लढा आहे. यामध्ये स्त्री-पुरूष समानता, स्वातंत्र, स्त्रियांची स्वतंत्रता आणि आत्मसन्मान या गोष्टींना प्राधान्य आहे.

जी कोणी व्यक्ती समाजातील लैंगिक भेदातुन लिंगभावावर आधारीत भेदातून होणारे स्त्रीचे शोषण

ओळखू शकते व ते शोषण थांबविण्यासंबंधी कृती करते ती स्त्रीवादी होय.

स्त्रीवादाचे वैशिष्ट्ये

* स्त्रीवादात स्त्रीचा प्रथम माणुस म्हणुन विचार करून तिच्या स्वातंत्र्याला महत्व दिले जाते.
* फक्त गृहिणी या भुमिकेला ठाम नकार देणे त्याचबरोबर घर, लग्न, आईपण यासोबत करिअरही तितकेच महत्वाचे मानणे.
* विवाहसंबधातील वास्तवता समजुन घेणे व शरणागताची भुमिका सोडून देणे.
* आईपण हेच एकमेव ध्येय न ठेवणे, स्वतःच्या सामर्थ्याबद्दल विश्वास बाळगणे व

स्वतःला मिळणाऱ्या दुय्यम स्थानाचा निषेध करण्याची मानसिक तयारी ठेवणे.

स्त्रीवादी विचार सरणीची पायाभुत तत्वे

**१. स्त्री-पुरूष समानता :** स्त्रीवादी भूमिकेतुन स्त्री-पुरूषांकडे समतेच्या दृष्टीने पहावे लागते. त्यामध्ये स्त्री-पुरूष परस्पर पुरक मानन्याची गरज असते. डावे-उजवे, मागे-पुढे, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद करून स्त्रीपण वेगळे करण्याचा प्रयत्न होतो त्यास विरोध करून स्त्रीच्या विकासासाठी पर्यायाने समाज व देशाच्या विकासासाठी स्त्री-पुरूष समानता बाळगणे स्त्रीवादी विचारसणीचे पहिले पायाभुत तत्व आहे.

**२. स्त्रीचा माणुस म्हणुन विचार :** संस्कृतीच्या, परंपरेच्या, पितृसत्ताक कुटूंबव्यवस्थेच्या माध्यमातुन स्त्रीचा माणुस म्हणुन जगण्याचा हक्क मागे पडत गेला आहे. स्त्रीचा माणुस म्हणुन विचार व्हावा केवळ बाई म्हणुन नाही हे स्त्रीवादी स्त्रीवादी विचार सरणीचे दुसरे पायाभुत तत्व म्हणता येईल.

**३. मानवी हक्काची प्राप्ती :** फ्रेंच राज्यक्रांतीमुळे जगाला मानवी हक्काचा जाहीरनामा मिळाला पण स्त्रियांच्या दृष्टीने अंमलबजावणी झाली नाही. जाहीरनामे, कायदे शब्दांतच अडकल्यामुळे मानवी हक्कापासुन स्त्री दुर राहिली. मत स्वातंत्र्याचा, शिक्षणाचा, रोजगार संधीचा, संपत्ती मालकी हक्क असला पाहिजे म्हणजे स्त्री-पुरूषांना समान हक्क असले पाहिजेत. मानवी हक्काची प्राप्ती स्त्रीला होणे हे स्त्रीवादाचे तिसरे पायाभुत तत्व होय.

**४. पुरूषसत्ताक कुटूंबव्यवस्था नाकारणे :** पितृसत्ताक कुटूंबव्यवस्था स्त्रियांचे शोषण करते. स्त्रीच्या शरीरावर, वर्तनावर, शिक्षणावर, व्यवसायावर पुरूषांची सत्ता असते. मुळात पुरूष ज्या बाबींचा उपभोग घेतो त्यासाठी स्त्रियांना बंदी घातली जाते. प्रजोत्पादाच्या माध्यमातुन तिच्यावर बाईपण लादले जाते. बाईपणामुळे स्त्रिची कोंडी होते त्यामुळे पितृसत्ताक कुटूंबव्यवस्था नाकारणे स्त्रीवादी विचार सरणीचे चौथे पायाभुत तत्व आहे.

**५. स्त्रीचा मानसिक विकास व सत्व संपाद :** स्त्रीचे शारीरीक बल हे पुरूषांपेक्षा कमी असते. शरीर दुर्बलतेमुळे स्त्रीला मागे ठेवले जाते. सततच्या गर्भारपणामुळे तिचे शरीर कमकुवत बनत जाते. प्रजोत्पाद हे आपले कर्तव्यच आहे हा समज स्त्रीमध्ये वाढत गेला. कालांतराने जाणीवजागृतीमुळे शरीरदुर्बलतेच्या न्युनगंडातुन मुक्त होऊन डोक्याचीव मनाची ताकद ही शरीराच्या ताकदीपेक्षा मोठी असते. ह्याचा विचार स्त्रिने केला.

स्वतःला मानसिक विकास करून सत्व संपाद करणे हे स्त्रीवादी विचारसरणीचे पाचवे पायाभुत तत्व मानता येईल.

**स्त्रीवाद साहित्य म्हणजे**

स्त्रीवादाची विचारसरणी जसजशी रूजत गेली तसतशी स्त्रीवादी साहित्याची निर्मीती होऊ लागली.

ज्या साहित्यातुन स्त्रीवादाच्या विचारसरणीप्रमाणे जीवन जगण्याच्या प्रयत्न करणाऱ्या स्त्रीमनाचा, कृतीचा, जीवनाचा आणि असे करताना निर्माण झालेल्या संघर्षाचा अविष्कार घडविते. त्या साहित्याला स्त्रीदावदी साहित्य म्हणता येईल. रोजलिंड कावर्डने आपल्या आर वुमेन नॉव्हेल्स फेमिनिस्ट नॉव्हेल्स या निबंधात स्त्रियांचे लेखन व स्त्रीवादी लेखन यातील फरक दाखविला आहे त्यांच्यामते, पितृसत्ताक समाजव्यवस्थेने दडपुन टाकलेल्या, कोंडमारा केलेल्या स्त्रीमनाचा, स्त्री जीवनाचा व समाजव्यवस्थेविरूध्द दिलेल्या संघर्षाचा अविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य याचा अर्थ असा की, स्त्रीने माणुस म्हणुन जगण्याच्या केलेल्या प्रयत्नांतुन ती जे जीवन जगते त्या जिवनाचा अविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असे मानले जाते.

* स्त्रीयांनी लिहीलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य अशी व्याख्या करणे चुकीचे ठरेल.
* स्त्रियांनी लिहिलेली सर्वच पुस्तके स्त्रीवादी असतातच असे नाही.
* स्त्री हा लिखानाचा केंद्र बिंदु असला म्हणजे ते लिखाण स्त्रीवादी होत नाही.
* एखादेवेळी पुरूषांनी लिहिलेले साहित्यही स्त्रीवादी असु शकते.

तेंव्हा साहित्यकृती स्त्री प्रतिमा कशी रंगविले, लिंगभावासंबधी या साहित्यकृतीचा दृष्टिकोन कसा आहे. लिंगभेदाची व्याख्या ही साहित्यकृती कशी करते इ.गोष्टिंचा विचार करून जे साहित्य निर्माण होते त्यास स्त्रीवादी साहित्य असे म्हणतात. स्त्रीवादी विचारसरणी ही एक जाणीव आहे. या जाणिवेचा विकास झ ाला तर स्त्रीला स्वतःचे सत्व मिळुन शकेल, स्वतःतील क्षमता लक्षात येईल व स्वतःतले माणुसपण लक्षात येईल व या जाणीवेने लिहीलेले साहित्य केवळ स्त्रीकेंद्री, स्त्रीप्रधान असणार नाहीतर ज्या साहित्यान स्त्रीवादी जाणीव आढळतील ते साहित्य स्त्रीचे असो वा पुरूषाचे ते स्त्रीवादी साहित्य ठरू शकेल. एकुणच स्त्रीच्या आत्मशोधाचा, स्वत्वाचा,अस्तित्वाचा शोध घेणारी जाणीव स्त्रीवाी साहित्याच्या केंद्रस्थानी असते.

**स्त्रीवादी भूमिका स्वीकारून त्याचे उपयोजन करणे**

मी काणे ? या भ्यानक प्रश्नाला स्वतःकडे उत्तर नसणे. या अवस्थेतून मला काय हवे आहे. ? ते मी ही होऊ शकते. याचा साक्षात्कार होऊन स्वतःकडे व जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलणे. म्हणजेच स्त्रीवादी भुमिका स्वीकारून त्याचे उपयोजन करणे होय.

* स्त्रीला स्वतःच्या सामर्थ्याबद्दल विश्वास हवा. स्वतःला मिळणाऱ्याला दुय्यम स्थानाचा निषेध करण्याची मानसिक तयारी हवी. घर किंवा बाहेरच्या जगात स्त्री म्हणुन सामर्थ्य व क्षमता नाकारणाऱ्या

कोणत्याही घटकांशी दोन हात करण्याची तयारी हवी. दुय्यम नागरीकत्वाची भुमिका टाकुन समान स्थान मिळविण्यासाठी तिने लढायला हवे. वेतन, संधी, समान वागणुक इ.बाबतीत जिथे स्त्रियांवर अन्याय होतो तिथे स्त्रीनेच आवाज उठवायला हवा.

* विवाह, बाळंतपण यासाठी स्त्रियांना मिळणाऱ्या सवलती हा त्यांचा हक्क आहे. त्यांच्यावरती कृपा नव्हे हे स्त्रीला ठाऊक असायला हवे त्यामुळे या गोष्टींनी नोकरीतल्या संधीवर गदा येता कामा नये

* विवाह संबधातील वास्तवता समजुन घेणे वैवाहिक संबधाना फाजील महत्व व त्यातील शरनागताची भुमिका सोडुन देणे. आईपण हेच आयुष्यातील एकमेव ध्येय न ठेवणे. संसारात स्त्रिया पुरूषांपेक्षा आपली खोटी प्रतिमा टिकवण्याबाबत जास्त आग्रही असतात त्यामुळे त्या संसारात गुंतून राहतात.

* घर, मुले, नवरा यांना आपण पुर्ण न्याय देऊ शकत नाही अशा अपराधीपणाच्या भावनेने स्त्रियांना नौकरीत पुर्णपणे बांधिल राहण्यात आडथळे निर्माण होतात, पण स्त्रीला हे अडथळे ठामपणे पार करता आले पाहिजेत. शिक्षणाने फक्त आदर्श गृहीणी होणे कोतेपणाचे आहे. पुरूषांशी माणूस म्हणुन निकोप स्पर्धा हवी, स्त्रि म्हणुन नको राजकारणातही गृहीणी म्हणुन नव्हे तर नागरीक म्हणुन तिला स्थान मिळायला हवे. घरात व समाजातही कमी महत्वाच्या जागा व निर्णय स्त्रीयांवर सोपवुन त्यांची तोंडे बंद करण्याच्या वृत्तीला कृतीने उत्तर द्यायला हवे.

* स्त्रीवादी स्त्रीयांना लवकर लग्न करून , चांगला नवरा मिळण्याची चिंात, एवढेच आयुष्याचे ध्येय राहणार नाही. विवाह म्हणजे स्वत:पासुन सुटकेचा मार्ग न होता दोन व्यक्तींची परस्परांशी व पर्यायाने समाजाशी असलेली बांधिलकी ठरेल.

### अपसंहार

स्त्रीमुक्ती आणि स्त्रीवाद याचा खरा अर्थ स्त्रीनं पुरूषाची बरोबरी करणं असा नसुन स्त्रीनं आपली नैतिक कर्तव्य ओळखुन त्याची स्त:ला जाण होऊन भानावर येणं तर पुरूषांनी स्वस्वार्थासाठी स्त्रीकडे एक उपभोग्य वस्तु म्हणुन न पाहता माणुस म्हणुन बरोबरीची वागणुक देवुन तिला नौकरी, व्यवसायात समान संधी देणे. स्त्रीवादी विचारसरणीने जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीमनाचा, जिवनाचा आणि कृतीचा अविष्कार स्त्रीवादी साहित्यातुन करणे.

### संदर्भ

१. डॉ.अश्विनी धोंगडे - स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन.

२. डॉ.विद्या व्यवहारे - साहित्य विमर्श.

३. विद्युत भागवत - स्त्री प्रश्नां ची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने

४. आनंद यादव- १९६० नंतरची सामाजीक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह.



Assistant Professor
JBSPM's Arts & Sci. College
Gadhi Tq. Georai Dist. Beed